# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जल व्यवस्थापन विषयक विचार

**प्रा.डॉ.तरोडे विजय लक्ष्मण** सहाय्यक प्राध्यापक लोकप्रशासन पदवी व पदव्युत्तर विभाग नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय, नांदेड

---

**प्रस्तावना :**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे जागतिक दर्जाचे विद्वान व अभ्यासक म्हणून ओळखले जातात. शोषण, अन्याय, अत्याचार, भेदभाव, असमानता, अज्ञान, अभाव, लोककल्याण माणसाला माणूस म्हणून दर्जा देण्याची बाब आणि अशा अनेक विषयाची चर्चा जेव्हा होते, तेव्हा डॉ.बाबासाहेब आंबेडकर आपल्यासोबत भक्कमपणे उभे आहेत. ही जाणीव निर्माण होते. आज जगातील प्रत्येक वंचितांचा व अन्यायग्रस्ताचा प्रखर आवाज म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे पाहिले जाते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा उल्लेख 'भारतीय संविधानाचे शिल्पकार' महान समाजसुधारक, अंधश्रद्धेचे विरोधक, झुंजार पत्रकार आर्थिक धोरणाचे धुरीण आंतरराष्ट्रीय संबंधाचे जाणकार व भाष्यकार, महिला व कामगारांच्या हक्कासाठी लढणारा लढवया प्रभवी वक्ता, सच्चा लोकशाहीवादी नेता प्रखर विज्ञान निष्ठ, शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढणारा नेता, ऊर्जा व जलसंधारण व्यवस्थापनाचा नियोजक, शिक्षणाचा प्रेरणास्तंभ निस्सीम, ग्रंथप्रेमी, समता प्रेमी, ज्ञानपुरूष, विचार स्वातंत्र्याचे खंदे पुरस्कर्ते, सच्चे देश भक्त व सर्वात महत्त्वाचे म्हणजे आधुनिक भारताचे निर्माता व जगातील सर्वात मोठा मानवतावादी विचारवंत म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा उल्लेख केला जातो.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन परिचय व लेखन कार्य :**

डॉ.बी.आर.आंबेडकर यांचा जन्म 14 एप्रिल 1891 मध्ये मध्य प्रदेशातील महू (लष्करी छावणी) येथे झाला होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या वडिलांचे नाव रामजी सपकाळ व आईचे नाव भिमाबाई सपकाळ हे होते. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण दापोली, सातारा व मुंबई येथे झाले. उच्च शिक्षण अमेरिकेतील कोलंबिया, विद्यापीठात (न्यूयॉर्क) लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल सायन्स येथून MSc व बॅरिस्टर ही पदवी त्यांनी प्राप्त केली होती. मुंबईतील सिडनेहॅम कॉलेज मधून त्यांनी अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून देखील कार्य केले होते. इ.स.1936 साली त्यांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. मुकनायक, बहिष्कृत भारत ही वर्तमानपत्रे काढली होती. इ.स.1946 मध्ये त्यांना मसूदा समितीचे अध्यक्ष करण्यात आले होते. प्रचंड मेहनत करून त्यांनी भारतीय राज्यघटनेची निर्मिती केली. इ.स.1956 साली आपल्या लाखो अनुयायांसोबत त्यांनी बौद्ध धर्माची दिक्षा घेतली.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जलव्यवस्थापन / जलधोरणविषयक विचार :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक दूरदृष्टी असणारे विचारवंत म्हणून ओळखले जातात. आधुनिक भारताच्या निर्मितीत डॉ.आंबेडकरांच्या अनेक विचारांचा संदर्भ घेण्यात आलेला दिसतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या दुरदृष्टीकोनातून भारतात जलव्यवस्थानाविषयक विचार मांडलेले दिसतात. ब्रिटिश काळात इ.स.1942 ते 1946 या दरम्यानच्या कालावधीमध्ये ब्रिटिश मंत्रीमंडळात डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे भारताचे मजूर मंत्री होते. त्यांच्याकडे बांधकाम, ऊर्जा व पाटबंधारे खात्याचा पदभार होता. त्यावेळी डॉ.आंबेडकरांनी भारतातील जलविषयक धोरणांचा सखोल अभ्यास करून एक दीर्घकालीन स्वरूपाचे जलधोरण ठरविले होते. या दीर्घकालीन जलविषयक धोरणांमध्ये डॉ.आंबेडकर असे म्हणतात की, जलसंपत्तीच्या विकासासाठी नदी खोऱ्यांचा बहुउद्देशीय विकास केला जावा. 'जल' ही एक अमूल्य संपत्ती असल्याने या संपत्तीचे योग्य वितरण व्हावे, नदी व नदी किनाऱ्यांचा बंदोबस्त करून पुराचा धोका टाळला जावा. पाण्याचा अपव्यय होऊ नये यासाठी मोठमोठी धरणे बांधली जावीत व त्यामध्ये पाणी साठविण्यात यावे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वप्रथम भारतात 'नदी जोड प्रकल्प' राबविण्यासाठी विचार मांडले होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेल्या जलव्यवस्थापनविषयक धोरणांमधूनच भारतात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अनेक धोरणात्मक उपाययोजना करण्यात आलेल्या दिसतात. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जलव्यवस्थापनविषयक विचारांमध्ये पुढील प्रमुख घटकांचा समावेश केला जातो.

**अ) दामोदर खोरे प्राधिकरणाची निर्मिती :**

दामोदर नदी ही भागीरथी व हुगळी या नदीला कोलकत्याच्या अलीकडे मिळते, या दामोदर नदीला वारंवार पूर येत होता. त्यामुळे या भागातील सर्वसामान्य लोकांचे जीवन अस्तव्यस्त होत होते. डॉ.आंबेडकरांच्या विचारांमधून या दामोदर नदीवर दामोदर खोरे प्राधिकरणाची निर्मिती करण्यात आली. पूर नियंत्रणबरोबरच वीज निर्मिती आणि या भागातील सिंचन कार्याला देखील मृत स्वरूप प्राप्त झाले. हा विचार डॉ.आंबेडकरांच्या जलधोरणांचा एक भाग समजला जातो.

**ब) हिराकुंड प्रकल्पाची स्थापना :**

दामोदर प्रकल्पानंतर ओरिसा राज्यामध्ये असणाऱ्या महानदीमुळे जो विध्वंस होत असेल त्या समस्येकडेही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी लक्ष दिले आणि त्यांच्या दिशा निर्देशा प्रमाणे दामोदर प्रकल्पासारखेच हिराकुंड प्रकल्प ओरिसा राज्यामध्ये स्थापन करण्यात आलेला दिसतो. या हिराकुंड प्रकल्पामुळे भारतात मोठे वीज निर्मिती केंद्र व सिंचनाचे क्षेत्र वाढलेले दिसते.

**क) भाक्रा-नांगल धरणची निर्मिती :**

भाक्रा-नांगल हा प्रकल्प हिमाचल प्रदेशातील सतजल नदीवर निर्माण करण्यात आलेला आहे. भाक्रा-नांगल या प्रकल्पात जलसाठा, सिंचन क्षमता, ऊर्जा निर्मिती, धरणग्रस्तांचे पुनर्वसन, नौकायन (नावेने प्रवास) आधीचे नियोजन करण्यात आले आहे. भाक्रा-नांगल प्रकल्पातून दिल्ली, चंदीगढ व उत्तर भारतातील बऱ्याच मोठ्या भागाला वीज पुरवठा केला जातो. या प्रकल्पाच्या उभारणेत डॉ.बाबासाहेबांच्या जलव्यवस्थापन विषयक विचारांचा आधार घेतला गेलेला दिसतो.

**ड) पाण्याविषयी मत :**

भारतीय राज्यघटनेत डॉ.आंबेडकर पाणी हा विषय केंद्र व समवर्ती सूचीमध्ये ठेवण्यात यावा. याविषयी आग्रही भूमिका घेत होते. डॉ.आंबेडकर यांचे असे मत होते की, जमीन व पाणी विकासाची दोन प्रमुख संसाधने आहेत. जमीन स्थिर असते. पाणी प्रवाही आहे डॉ.आंबेडकर असे म्हणतात की, आपल्या देशात काही नद्या आंतरराज्यीय आहेत. (गंगा, गोदावरी, कृष्णा, कावेरी, तापी, नर्मदा, रावी व सतलज) तर काही आंतरराष्ट्रीय नद्या (ब्रह्मपुत्रा, सिंधू व गंगा) या नद्यांच्या पाणी वापराबाबत व वाटपाविषयी वारंवार वाद उद्भवू शकतात. त्याकरिता वेळोवेळी केंद्र सरकारला निर्णायक भूमिका घ्यावी लागेल. म्हणून डॉ.आंबेडकर यांचे असे मत होते की, पाणी हा विषया केंद्र सरकारच्या अखत्यारित असला पाहिजे, परंतु दुर्दैवाने या विषयाकडे लक्ष दिले नाही, त्याचा विपरीत परिणाम पाण्यावरून राज्याराज्यांमध्ये संघर्ष होत असलेला पाहतोत.

**इ) केंद्रीय जल व शक्ती आयोग :**

डॉ.आंबेडकर यांचे असे मत होते की, मोठमोठी बंधारे बांधून त्या आधारावर मोठमोठी वीज उत्पादक केंद्र निर्माण केली जावी. त्यासाठी केंद्रीय जल व शक्ती आयोगाची स्थापना करण्यात यावी. या आयोगामार्फत वीज उत्पादन करण्याच्या कार्यावर भर द्यावा. डॉ.आंबेडकरांचे मत होते. आज या आयोगाला केंद्रीय जल आयोग म्हणून संबोधले जाते. या केंद्रीय जल आयोगाच्या निर्मितीचे श्रेय डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना जाते. या केंद्रीय जल आयोगाने इ.स.2000 मध्ये डॉ.आंबेडकरांचे पाणी याविषयी पुस्तक प्रसिद्ध करून डॉ.आंबेडकरांना व त्यांच्या योगदानाला अधोरेखित केले होते.

थोडक्यात, या वरील विश्लेषणाच्या माध्यमातून आपल्याला हे लक्षात येते की, आज स्वातंत्र्याच्या 75 वर्षाच्या काळात देखील पाणी प्रश्न बिकट बनत असताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे देशाच्या जलव्यवस्थापनविषयक विचारांचे महत्व अधोरेखित करता येते.

**संदर्भ ग्रंथ यादी :**


1. भारतीय तथा पाश्चिमात्य राजकीय विचारवंत, प्रा.अरविंद शिंगारपुरे
2. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे खंड 1 व 2, संपादक मा.क.गाजरे
3. डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना, प्रा.रावसाहेब कसबे
4. राजकीय विचाराचा इतिहास, ना.य.डोळे
5. डॉ.बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी विशेषांक-1991 (लोकराज्य)